UGC & SRTMU Nanded Sponsered.

ISSN No. : 2229-6476

An Internationally Referred, Registered & Peer Reviewed, Reputed Research Journal in History


# Kandharpur

A Special Issue
of
One Day National Conference
on

# NAXALISM

## Historical & Social Analysis

on
17th August, 2015




**Editor**
**Dr. G.N. Shinde**
**Dr. G.S. Patil**

# नक्षलवादाचा उदय आणि विकास

**प्रा.डॉ.वसंत व्यंकटराव कदम**
इतिहास विभाग प्रमुख
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय.
हिमायतनगर

आधुनिक भारतीय समाजाला ज्या विविध सामाजिक समस्यांना तोंड दयावे लागते त्यात नक्षलवाद ही राष्ट्राला भेडसावणारी गंभीर, घातक आणि महत्त्वाची समस्या आहे असे म्हणावे लागेल. नक्षलवादी लोकांच्या विध्वंसक कारवायामुळे देशातील अनेक राज्यात निरपराध लोकांचा नाहक बळी दिला जातो आहे व त्या-त्या राज्यात आणि समाजात दहशतीचे वातावरण निर्माण केले जात आहे. आज पर्यंत देशाच्या विविध भागात नक्षलवादयांनी केलेल्या कारवाया आणि अंदोलनात हजारो पोलीस अधिकारी आणि सर्वसामान्य समाजाला आपला जीव गमवावा लागत आहे. वर्तमान परिस्थितीत म्हणजे आजही अनेक राज्यात त्यांच्या कारवाया सुरूच आहेत. म्हणुनच आज देशातील राजकीय आणि समाजिक बाबतीत नक्षलवाद ही एक गंभीर समस्या आणि समाजातील एक ज्वलंत प्रश्न निर्माण झाला आहे. आज राष्ट्रात गोंधळ अराजकता निर्माण होऊन राष्ट्राच्या विकासाला अडथळा निर्माण होत आहे. हा नक्षलवाद म्हणजे नेमकी कोणती संकल्पना, कोणता विचार आहे, देशात नक्षलवादाचा प्रारंभ कसा झाला, या विचारसरणीचा पाया कसा रचला गेला आणि देशात हा नक्षलवाद कसा पसरत गेला याचा उहापोह होणे गरजेचे आहे.

इ.स.1967 मध्ये पश्चिम बंगाल मधील नक्षलबारी या गावातून पहिल्या प्रथम शेतकऱ्यांनी त्यांच्या शेती विषयक प्रश्नावरुन अंदोलन सुरु केले विशेषतः त्यावेळी या अंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्षातील (मार्क्सवादी) काही जहाल मतवादी कार्यकर्ते सहभागी झाले व त्यांनीच अंदोलनाचे सुत्र आणि नेतृत्व आपल्या हाती घेतले. या शेतकऱ्यांच्या अंदोलनामध्ये लोकांनी सरकार विरुध्द अक्रमक भुमिका घेतली व मार्क्सवादी कम्युनिस्ट विचाराच्या पुढाऱ्यांनी प्रक्षोभक वातावरण निर्माण केले त्यामुळे हे नक्षलबारी या गावी सुरु झालेले अंदोलन प्रसिध्दीस आले. नक्षलबारी या गावातून सुरु झालेली ही चळवळ पुढील काळात भारताच्या विविध राज्यात पसरली याच अंदोलनाला नंतर वेगळे स्वरुप प्राप्त झाले. परंतु त्या गावाच्या नावावरुन या अंदोलनातील लोकांना नक्षलवादी या नावाने ओळखले जाऊ लागले.

15 ऑगस्ट 1947 रोजी भारत देश इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीतून मुक्त होऊन स्वातंत्र्य झाला आणि स्वतंत्र भारताने लोकशाही शासन पध्दतीचा स्विकार केला. अशिया खंडालगत आणि भारताच्या शेजारी असलेल्या रशिया या खंडप्राय देशात इ.स.1917 मध्ये मार्क्सच्या विचारसरणीनुसार साम्यवादी क्रांती होऊन या देशाने साम्यवादी शासन प्रणालीचा स्विकार केला. जगात साम्यवादी क्रांती आणि साम्यवादी शासन प्रणालीचा स्विकार करणारा हा पहिला देश होता म्हणुन पुढे या देशाला साम्यवादी विचारसरणीचा प्रसार जगात करावयाचा होता हाच दृष्टीकोन समोर ठेवून याच देशाने कोमिन्टर्ण या आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या संघटनेची स्थापना करुन याच कोमिन्टर्ण च्या माध्यमातून सर्व जगात साम्यवादाचा प्रसार झाला

पाहीजे या दृष्टीकोनातून जगातील अनेक देशात हालचाली सुरु केल्या. भारताच्या शेजारीच असलेल्या जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या चिन या देशात इ.स.1920 मध्ये साम्यवादी पक्षाची स्थापना रशिया या देशाने करुन त्या देशातील कोमिंगटांग या लोकशाहीवादी डॉ.सन-यत सेन व चैंग-काई-शेक यांच्या पक्षासोबत युती करण्यास भाग पाडले या युतीच्या मोबदल्यात रशियाने डॉ.सन-येत-सेन व चैंग-काई-शेक यांना आर्थिक व लष्करी मदत केली व गुप्त मार्गानी चिनी साम्यवादी पक्षाला मदत करुन खतपाणी घातले व चिन या देशात साम्यवादाचा प्रसार केला. चिनी साम्यवादी पक्षाला माओ सारख्या धुरंधर नेता लाभला. माओने चिनमध्ये अविश्रांत मेहनत घेऊन साम्यवादाचा प्रसार तळागाळातील गोरगरीब कामगार विशेषत: शेतकऱ्यांपर्यंत पोहचवला शेवटी इ.स.1949 मध्ये चैंग-काई-शेक ला संपऊन त्या देशात साम्यवादी क्रांती केली.

चीन आणि रशिया ही राष्ट्रे एक लोकसंख्येच्या दृष्टीने तर दुसरा भु-क्षेत्रफळाच्या दृष्टीने जगात मोठी असलेली राष्ट्रे साम्यवादी विचारसरणीचे बनले त्या दोन्ही राष्ट्राच्या शेजारी असलेला जगात दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या असलेला भारत हे राष्ट्र मात्र लोकशाहीवादी राष्ट्र बनले किंवा निर्माण झाले होते म्हणुन भारतात साम्यवाद (मार्क्सवाद) आणि साम्यवादी पक्ष वाढला पाहीजे भारतातील लोकशाही शासन पध्दती मोडकळीस आली पाहीजे. पर्यायाने भारत हा देश दुर्बल देश बनले पाहीजे. या चिन च्या अभिरुचीमुळे आणि चिन या देशाच्या चेतावनीमुळे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया (एम.एल.) चा जन्म इ.स.1969 मध्ये भारता झाला. आपला मुख्य हेतू साध्य करण्यासाठीच भारतातील नक्षलवादी अंदोलनाला आणि अंदोलकांना उत्तेजन देण्याचे कार्य साम्यवादी राष्ट्रांनी केले. म्हणुन खऱ्या अर्थाने भारतातील नक्षलवादी विचाराला सैध्दांतिक आधार आणि पाठींबा कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायना च्या 9 व्या अधिवेशनात दिला गेला. या प्रसंगी अधिवेशनात भाषणे करतांना अधिवेशनातील नेते म्हणाले की मार्क्स-लेनीन पेक्षा माओचे विचार उच्चप्रतीचे आहेत असे म्हणणारा एक मोठा गट निर्माण झाला. भारतात या विचाराचा वापर करीत त्यावेळेचा भारतीय नक्षलवादी पुढारी चारु मुजुमदार यांच्या गटाने येथे असे जाहीर केले की चिनी साम्यवादी पक्षाचा जो अध्यक्ष आहे तो आमचा पण अध्यक्ष आहे.

भारतात मुळ शेतकऱ्यांनी सुरु केलेल्या अंदोलनाला नक्षलवादी चळवळीचे स्वरुप मार्क्सवादी नेत्यांनी म्हणजे माओवादी नेत्यांनी दिले. पश्चिम बंगाल मध्ये सुरु झालेली ही चळवळ केवळ पश्चिम बंगाल पुरती मर्यादीत न राहता ती बंगाल प्रांतातून बिहार प्रांतात पोहचली तेथे नक्षलवादी नेत्यांनी भुमीहीन मजुरासाठी लढा सुरु केला. येथे कामगार व गरीब लोकांचे शत्रु असलेल्या प्रस्थापितांचा विध्वंस करा. असा नारा नक्षलवादी नेता चारु मुजुमदार यांनी दिला. त्यांच्या या घोषणेमुळे गरीब शेतकरी, मजुर, कामगार आणि मध्यम वर्ग त्यांच्याकडे आकर्षीत झाला. परंतू त्यांनी सुरु केलेल्या बिहार मधील अंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला नाही. स्वत:ला नक्षलवादी समजणाऱ्या स्त्री-पुरुष अंदोलकांनी यात प्रस्थापित, जमीनदार, सावकार, अधिकारी आणि पोलीस अधिकारी यांना गुप्तपणे ठार मारण्याचे सत्र सुरु केले. इ.स.1969 ते इ.स.1972 या तीन वर्षाच्या कालावधीत नक्षलवादी अंदोलकांनी 2000 लोकांना ठार मारले. तसेच याच कालावधीत श्रीमंत व जमीनदार वर्गाची 700 घरे लुटली. जवळपास 1000 दरोडे हिंसात्मक क्रिया घडवून आणल्या विशेष म्हणजे या नक्षलवादयांच्या चळवळीत व्यावसायीक गुन्हेगारी शिरली तेंव्हा मात्र नक्षलवादयांचे अंदोलन अधिकच बदनाम होऊ लागले. पश्चिम बंगाल आणि बिहार मध्ये

पोलीसांनीही जवळपास 400 नक्षलवादी अंदोलकांना ठार मारले. तर 6000 नक्षलवादी लोकांना जेलमध्ये डांबले. इ.स.1972 नंतर हे नक्षलवादी अंदोलनाचे लोन केरळ, ओरीसा, तामीळनाडू, त्रिपुरा, छत्तीसगड, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्राच्या काही भागात पसरले. इ.स.1988 ते इ.स.1997 या कालावधीत आंध्रप्रदेश आणि बिहार या राज्यांची परिस्थिती अत्यंत खराब असल्यामुळे या प्रदेशात नक्षलवादी चळवळ येथे अधिक प्रमाणात रुजली त्याच कालावधीत नक्षलवादी चळवळीचे लोण आंध्रप्रदेशला लागुन असलेल्या महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या राज्यांच्या काही जिल्हयात पसरले.

आजही शोषित, गरीब व आदिवासी लोक काही प्रमाणात नक्षलवादीत समाविष्ट असून पूर्वाश्रमीचे जमीनदार, सावकार आणि अन्य शोषक यांच्या विरुध्द त्यांचा लढा चालू आहे. सरकार हे नक्षलवादी अंदोलनाकडे केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न एवढयाच दृष्टीकोनातून पाहत होते. परंतू इ.स.2006 मध्ये इंटेलिजन्स एजन्सी संशोधन संस्थेने केलेल्या संशोधनाचा अभ्यास करुन तत्कालीन भारताचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी नक्षलवाद हा भारतातील सर्वात गंभीर अंतर्गत धोका असल्याचे जाहीर केले. त्या धरतीवर उपाययोजना सुचविल्या. तसेच फेब्रुवारी 2009 मध्ये केंद्र सरकारने सर्व नक्षलवादी प्रभाव आणि कारवाया होत असलेल्या सर्व नक्षलवादी राज्यात (IAP) हा एकात्मिक कृती योजना म्हणून नविन राष्ट्रीय उपक्रम जाहीर केला.

नक्षलवादाचा उदय आणि वाढ यांचा अभ्यास करता असे म्हणता येईल की देशात नक्षलवादी अंदोलनाचा विकास झपाटयाने झाला. या नक्षलवादी आंदोलकांना बाहय देशाचा शक्तीचा पाठींबा असला तरी नक्षलवादी अंदोलक याच देशातील गरीब, वंचीत, सुशिक्षित बेकार, शोषीत लोक आहेत. सुखी, श्रीमंत आणि समृध्द लोक नक्षलवादी बनत नाहीत. हे विचारात घेऊन सरकारने गरीब, वंचीत, शोषीत आणि सुशिक्षित बेकार यांच्या मुख्य जीवन जगण्याच्या अडचणी जाणून घेऊन त्यांना जिवन जगण्याचे साधने उपलब्ध करुन देऊन त्यांच्यात वैचारीक जागृती करुन आपल्या मातृभुमीविषयी प्रेम, आत्मीयता आणि देशाच्या शासन पध्दतीचा आदर केला पाहीजे हे जेंव्हा त्यांना कळेल, तेंव्हाच देशातील नक्षलवाद कमी होऊ शकतो.

**संदर्भ :-**

1) कुलकर्णी पी.के., भारतातील सामाजिक समस्या, नागपूर विद्या प्रकाशन 1998.

2) आगलावे प्रदिप, भारतीय समाजरचना आणि समस्या श्री साईनाथ प्रकाशन, आ.तिसरी ᱨ 2008.

3) कांबळे सि.टी. व पवळे टि.एस., भारतील सामाजिक रुपरेषा, नांदेड क्रियटीव्ह पब्लीकेशन ᱨ 2010.

4) जोशी बी.आर. (संपा.) समाजिक ज्ञानकोश, पुणे डायमंड पब्लीकेशन - 2007.

5) काळदाते सुधा, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, औरंगाबाद, विद्या पब्लिशर्स आ.प.-2005.